# प्रेसनोट दि.02.06.22

**पो. स्टे. विमानतळ, नांदेड गूरनं 119/22 कलम 302, 307, 120(ब), 34 भादंवि सहकलम 3/25 आर्म ॲक्ट गून्हयातील एक आरोपी पंजाब राज्यातून ताब्यात घेतल्या बाबत**

दि. 05.04.22 रोजी बांधकाम व्यवसायीक संजय बियाणी यांचे हत्या प्रकरणी पो. स्टे. विमानतळ, नांदेड येथे गूरनं 119/22 कलम 302, 307, 120(ब), 34 भादंवि सहकलम 3/25 आर्म ॲक्ट प्रमाणे गून्हा दाखल झालेला आहे. सदर गून्हयाचा तपास एसआयटी करत आहे.

सदर गुन्हयामध्ये हरदिपसिंघ ऊर्फ हार्डी सपूरे रा. यात्रीनिवास रोड नांदेड यांचा सहभाग असल्याची व तो पंजाब राज्यामध्ये पळुन गेल्याची गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली. सदर आरोपीस पकडण्यासाठी सपोनि पी.डी. भारती व स्टाफ यांचे पथक तयार करुन पंजाब येथे रवाना करण्यात आले. सदर पथकाने श्री शर्मीदरसिंघ धनोह पोलीस निरीक्षक सीआयस्टाफ, पटीयाला पंजाब राज्य व त्यांचा स्टाफ यांच्या मदतीने हरदिपसिंघ ऊर्फ हार्डी बबनसिंग सपूरे वय 28 वर्षे रा. यात्रीनिवास रोड नांदेड यास पटीयाला पंजाब राज्य येथुन ताब्यात घेवून एस.आय.टी. समोर हजर केले सदर आरोपीचा तपासामध्ये गुन्हामध्ये सहभाग आढळुन आल्याने दिनांक 01.06.2022 रोजी अटक करण्यात आली. सदर आरोपीस आज रोजी मा. न्यायालया समोर हजर केले असता त्याची दिनांक 10.06.2022 पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळाली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड